महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम, १९६६ च्या तरतुदीअन्वये प्रारूप विकास आराखडा तयार केल्यावर व मान्यता दिली असता अकृषिक परवानगी देताना घ्यावयाची खबरदारी.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन पत्र क्रमांक : एस ३०/९०/२२४३/[७८६] ल-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २३ नोव्हेंबर, १९९०

परिपत्रक :

महाराष्ट्र प्रादेशिक विकास व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १८ अन्वये प्रारूप विकास आराखडा तयार केल्यावर किंवा त्याला मान्यता दिल्यानंतर त्या संबंधित क्षेत्रातील शेतीसाठीचा वापर वगळून जमिनीच्या वापरात बदल करण्याकरिता अकृषिक परवानगी देताना प्रारूप आराखड्यातील तरतुदींकडे दुर्लक्ष करण्यात येते व त्याचा भंग करणारी परवानगी देण्यात येते असे काही प्रकरणात शासनाच्या निदर्शनास आले आहे. तसेच, वसाहतींसाठी अकृषिक परवानगी देताना नागरी सुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे ही बाब विचारात घेतली जात नाही. त्यामुळे नंतर अडचणी उपस्थित होण्याची शक्यता असते.

२. वरील परिस्थितीचे अनुषंगाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १८ अन्वये प्रारूप प्रादेशिक आराखडा तयार केल्यावर किंवा त्याला मान्यता दिल्यानंतर त्या क्षेत्रातील शेतीसाठीचा वापर वगळून जमिनीच्या वापरात बदल करण्याकरिता अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी अकृषिक परवानगी देण्यापूर्वी प्रारूप आराखड्यातील तरतुदींचा भंग होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. दिलेली अकृषिक परवानगी प्रारूप आराखड्यातील तरतुदींशी विसंगत असता कामा नये. तसेच, वसाहतींना अकृषिक परवानगी देताना नागरी सुविधा उपलब्ध आहेत याची खात्री करून घेण्यात यावी व त्यादृष्टीने नियोजन प्राधिकाऱ्याचे " ना हरकत प्रमाणपत्र " असल्याची खात्री करून घ्यावी.

महत्वाचे

जिल्हाधिकारी कार्यालय,
रत्नागिरी

कृ. मा. प.

तसेच, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,
१९६६ च्या कलम ४३ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे विकास आराखडा
तयार करण्यात येत असल्याबाबतची अधिसूचना प्रसिध्द झाल्यावर
नियोजन प्राधिकाऱ्याची लेखी परवानगी घेतल्याशिवाय जमिनीच्या
वापरात बदल अगर त्यात काही सुधारणा करण्यास संबंधितांना
परवानगी देण्यात येऊ नये. याबाबतचे प्रमाणपत्र कागदपत्रात समाविष्ट
असल्याबाबतची खात्री करुन घेतल्यानंतरच अकृषिक परवानगीबाबतची
कार्यवाही करण्यात यावी.

४. जिल्हाधिकाऱ्यांनी वरील सर्व गोष्टी संबंधित महसूल
अधिकाऱ्यांच्या नजरेस आणाव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ ग. ह. पाटील ]

अवर सचिव,

महसूल व वन विभाग.